# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १४.०५.२०२६ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— जिवे ठार मारणाऱ्या अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १४.०५.२०२६ चे ०६.५५ वा. चे पुर्वी पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, माधव नगरी कडून मिहानकडे जाणाऱ्या रोड लगत असलेल्या आधार नगरी वसाहतीच्या निर्माणाधीन मोकळ्या जागेवर टाकलेल्या तारेच्या कुंपनाच्या आंत कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणावरून एका मोठ्या दगडाने एका ३० ते ३५ वर्षे वयाचे अनोळखी पुरूषाचे डोक्यात मारून त्यास जिवानिशी ठार केले. मृतकाची ओळख पटविली असता त्याचे नाव आकाश कृष्णा भरडे वय २८ वर्ष रा. पंचशीलनगर, भीमनगर, इसासनी, नागपूर असे निष्पन्न झाले.

यांप्रकरणी सरतर्फे फिर्यादी सपोनि. योगेश रामचंद्र मोहिते यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एम. आय.डी.सी. येथे मपोउपनि रेश्मा सरगर ७०३०३६२७६० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे लकडगंज :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सौ. रिना संदीप डोंगरे वय ४३ वर्षे हया कृषी अधिकारी असून त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत वर्धमाननगर, सातवचन लॉनचे मागे, ॲक्टरी फ्री झोन, गोडावून नं. २२/२ येथे शासनाने प्रतिबंधीत केलेले बियाणे बेकायदेशीररित्या विक्री करण्याचे उद्देशाने साठवून ठेवलेले आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन दिनांक १३.०५.२०२६ चे ०७.०० ते ११.३० वा. चे दरम्यान पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) बियाणे विक्रेता कंपनी सुकून सीडस् प्राय. लिमी., सुरहार सर्कल, थालतेज, अहमदाबाद, गुजरात या कंपनीद्वारे उत्पादीत प्रतिबंधीत बियाणे 'सुकून १५ बीग' बेकायदेशीररित्या संगनमताने आरोपी क्र. २) विक्रमभाई चौधरी रा. नागपूर उर्फ विक्रम जाट, अमरावती यांनी शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे उद्देशाने विक्री करणेकरीता साठवून ठेवल्याचे दिसून आले. आरोपीचें ताब्यातून बियाणे व ट्रक असा एकूण ५१,१९,२०७/— रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सुरज कोल्हे ९०११३५८३९३ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३(५) भा.न्या.सं. सहकलम ७(अ),७(ड),१९ बियाणे कायदा, सहकलम १० महाराष्ट्र कापूस बियाणे २००९, सहकलम १,२,३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमना** :— दिनांक १४.०५.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, विजय नगर, देशी दारू भट्टीसमोरील रोडवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, बेशुध्द

अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान १२.११ वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यापकरणी फिर्यादी श्याम मोहनसिंग परमार वय ४८ वर्षे रा. प्लॉट नं. २६३, सिता निवास गुजराती कॉलोनी, कळमना, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. अजय गरजे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, मोटर वाहन न्यायालय, नागपुर. | २०४५/२०२३ | कलम ४५४,३८० २१२,४१४, ४११,३४ भा.दं. वि. | सम्मेत उर्फ पोंगी संतोष दभाणे, आणि ईतर ४ रा. प्लॉट नं. ५९, सुभाष नगर झोपडपट्टी, गल्ली नं. ०४, नागपूर. | १५.०५.२०२६ |

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उपनिरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.